# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 05 April 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ०५ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.**

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वर्ष २०२४-२५ मधलं आपलं पहिलं व्दै-मासिक पतधोरण आज जाहीर केलं. सलग सातव्यांदा व्याजदरात कुठलाही बदल करण्यात आला नाही, यामुळं कर्जदारांना दिलासा मिळाला आहे. रेपोदर सहा पूर्णांक पाच टक्क्यांवर स्थिर असून महागाईत घट पाहायला मिळाल्याचं आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी म्हटलं आहे. युपीआय द्वारे बँकेत पैसे भरण्याची सुविधा लवकरच सुरू करणार असल्याचंही ते म्हणाले. चालू आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन दर सात टक्के आणि ग्राहक किंमत निर्देशांक चलनवाढ चार पूर्णांक पाच टक्के राहण्याची शक्यताही दास यांनी व्यक्त केली. तसंच गत २९ मार्चरोजी भारताचा परकीय चलनसाठा ६४५ अब्ज ६० कोटी डॉलरच्या आतापर्यंत सर्वोच्च पातळीवर पोहचल्याचं त्यांनी सांगितलं.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मतदानाची टक्केवारी वाढवण्याबाबत निवडणूक आयोगाच्या वतीनं आज नवी दिल्लीत बैठक होणार आहे. अकरा राज्यांतल्या ज्या जिल्ह्यांमध्ये मागील निवडणूकांमध्ये मतदानाची टक्केवारी कमी होती, अशा जिल्ह्यांचे निवडणूक अधिकारी आणि महापालिका आयुक्त या बैठकीत सहभागी होणार आहेत.

****

लोकसभा निवडणुकीसाठी कॉंग्रेसनं आपला जाहीरनामा आज घोषित केला. सत्तेत आल्यास येत्या तीन वर्षांत २३ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढू असं जाहीरनामा समितीचे अध्यक्ष पी. चिदंबरम यांनी म्हटलं आहे. रोजगार, उत्पन्न आणि सरकारी योजनांचा लाभ देणार असल्याचं जाहीरनाम्यात नमूद आहे. तरुण, महिला, मजूर आणि शेतकरी यावर जाहीरनाम्याद्वारे कॉंग्रेसनं लक्ष केंद्रित केलं

आहे. पाच न्याय आणि २५ हमींची घोषणाही आपल्या जाहीरनाम्याद्वारे काँग्रेसनं केली आहे. तसंच मजुरांचं वेतन प्रतिदिन चारशे रुपये इतकं करणं, गरीब महिलांना वर्षाला एक लाख रुपये देणं आणि जातनिहाय जनगणना करणं असे मुद्दे जाहीरनाम्यात आहेत.

****

निवडणूक आयोगानं, आम आदमी पक्षाच्या नेत्या अतिशी मार्लेना यांना आचारसंहिता नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी नोटीस बजावली आहे. अतिशी यांनी, भारतीय जनता पक्षात सामील होण्यासाठी दबाव टाकण्यात येत असल्याचं वक्तव्य केलं होतं. याप्रकरणी आयोगानं, अतिशी यांना उद्या सायंकाळी पाच वाजेपर्यंत आपलं म्हणणं सादर करण्यास सांगितलं आहे.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ-सीबीएसइनं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार परीक्षा मूल्यांकन आणि मूल्यमापन पद्धतींमध्ये बदल केले आहेत. सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार, इयत्ता अकरावी आणि बारावीच्या परीक्षांमधील बहुपर्यायी प्रश्न, परिस्थितीवर आधारित प्रश्न किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या प्रश्नांची संख्या चाळीसवरून पन्नास टक्के इतकी करण्यात आली आहे. तर शैक्षणिक सत्र २०२४-२०२५ च्या परीक्षांमध्ये लहान उत्तरं आणि दीर्घ उत्तरांच्या प्रश्नांसह अभिव्यक्तीवर आधारित प्रश्न चाळीस टक्क्यांवरून तीस टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

परभणी लोकसभा मतदार संघात दुसऱ्या टप्प्यात निवडणुकीसाठी एकुण ४२ उमेदवारांनी ६५ अर्ज दाखल केले, या सर्व अर्जांची छाननी आज सकाळी अकरा वाजेपासून जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू आहे. नांदेड इथं ७४ उमेदवारांनी ९२ अर्ज सादर केले असून याची छाननी आज होईल. दरम्यान, उमेदवारांना आठ एप्रिल पर्यंत आपले अर्ज मागे घेता येणार आहेत.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, नांदेड जिल्ह्यात गुन्हेगारांच्या वीस टोळ्यांमधील साठ जणांना हद्दपार तर चौदा जणांना तुरुंगात स्थानबद्ध केलं आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी ही माहिती दिली आहे. निवडणुकीच्या कालावधीत कोणतेही अनुचित प्रकार घडू नये, कायदा सुव्यवस्था

अबाधित राहावी यासाठी पोलिस विभागाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. तसंच बेकायदेशीर पिस्तूल, गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या दहा जणांना अटक करण्यात आली. जिल्ह्यात अवैध धंदे करणाऱ्या ८२ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, बुलडाणा जिल्ह्यात, प्रत्येक नागरिकानं मतदानाचा हक्क बजावून, लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केलं आहे. आगामी निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी, आज जिल्ह्यातल्या ग्रामीण आणि शहरी भागात मतदार जागृती फेरी काढण्यात आली. तसंच जिल्ह्यात सुमारे १८ हजार नवमतदार, सोळा हजार दिव्यांग मतदार, ३० हजार ज्येष्ठ मतदार इत्यादींसह संपूर्ण मतदारांना दृष्टीक्षेपात ठेऊन मतदार जाणीव जागृतीसाठी व्यापक प्रयत्न केले जात असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, निवडणुकीसंदर्भात तीनही निवडणूक निरीक्षकांनी जिल्ह्यात विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाचा आढावा घेतला आहे.

****